# दैनिक वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शुक्रवार दि.२२ मे २०२६ 9422660077 ● आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक २५९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Friday 22 May 2026 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 259 ● Pages 4 ● Rate 4 Rs


## विकास लवांडेंना अखेर अटक

**मुंबई**–राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांना अखेर पोलिसांनी अटक केली आहे. वारकरी संप्रदायाबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्याप्रकरणी दाखल गुन्ह्यात पुणे न्यायालयाने त्यांचा अंतरिम अटकपूर्व जामीन रद्द केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. न्यायालयाने मुदतवाढीचा अर्ज फेटाळून लवांडे यांचे संरक्षण काढून घेतल्याने वाघोली पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. या प्रकरणामुळे राजकीय आणि वारकरी वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे.वारकरी संप्रदायात घुसखोरी होत असल्याचा दावा विकास लवांडे यांनी केल्याचा आरोप होता. या वक्तव्याविरोधात नलिनी आशिष वायाळ (वय ४१, रा. येरवडा) यांनी वाघोली पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर लवांडे यांच्याविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला होता. या प्रकरणात अतिरिक्त सत्र न्यायालयाने यापूर्वी २० मेपर्यंत अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर केला होता. तसेच तपास अधिकारी, सरकार पक्ष आणि वाघोली पोलिसांना याबाबत भूमिका मांडण्याचे निर्देशही देण्यात आले होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस सोडून दुसरा पर्याय निवडेन पण भाजपसोबत जाणार नाही

## रोहित पवारांच्या विधानाने खळबळ; विलिनीकरणावर शरद पवार गटाला स्पष्ट इशारा

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलिनीकरणाची चर्चा गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात जोर धरत असतानाच आता आमदार रोहित पवार यांनी केलेल्या एका विधानामुळे राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येतील आणि शरद पवार गट एनडीएसोबत सत्तेत सहभागी होऊ शकतो, अशा चर्चांना उधाण आले होते. या पार्श्वभूमीवर बुधवारी शरद पवार यांच्या उपस्थितीत पक्षाची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत पक्षातील वरिष्ठ नेते, आमदार आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत दोन्ही राष्ट्रवादींच्या संभाव्य विलिनीकरणावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीदरम्यान अनेक पदाधिकाऱ्यांनी पक्ष नेतृत्वाकडे थेट भूमिका स्पष्ट करण्याची मागणी केली होती. विलिनीकरण होणार की नाही, याबाबत कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम असल्याचेही काहींनी सांगितले. त्यानंतर खासदार सुप्रिया सुळे आणि पक्षाचे वरिष्ठ नेते जयंत पाटील यांनी स्पष्ट शब्दांत पक्षाची भूमिका मांडली. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे कोणतेही विलिनीकरण होणार नसल्याचे त्यांनी सांगितले. या बैठकीत शरद पवार उपस्थित असले तरी त्यांनी स्वतः या मुद्द्यावर कोणतीही सार्वजनिक प्रतिक्रिया दिली



नाही. मात्र, त्यांच्या उपस्थितीतच पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी विलिनीकरणाच्या चर्चांना पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान, या सर्व घडामोडींमध्ये रोहित पवार यांनी एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत अत्यंत महत्त्वाचे विधान केले आहे. मुलाखतीदरम्यान त्यांना पक्षाच्या भूमिकेबाबत आणि सरकारविरोधातील आक्रमकतेबाबत प्रश्न विचारण्यात आला. राष्ट्रवादी शरद पवार गटातील अनेक नेते सरकारविरोधात फारसे आक्रमक दिसत नसल्याने अजूनही मागच्या दाराने चर्चा सुरू असल्याचा संशय लोकांमध्ये असल्याचे त्यांना सांगण्यात आले. तसेच भविष्यात पक्षाने विलिनीकरण करून एनडीएसोबत जाण्याचा निर्णय घेतला तर तुमची भूमिका काय असेल? असा थेट प्रश्न रोहित पवार यांना विचारण्यात आला.

या प्रश्नाला उत्तर देताना रोहित पवार यांनी स्पष्ट शब्दांत आपली भूमिका मांडली. जर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने विलिनीकरण करून एनडीएसोबत जाण्याचा निर्णय घेतला, तर मी दुसरा पर्याय निवडेन. पण भाजपसोबत जाणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले. त्यांच्या या विधानामुळे राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे. राष्ट्रवादीतील अंतर्गत मतभेद, संभाव्य राजकीय समीकरणे आणि भविष्यातील आघाड्यांबाबत आता पुन्हा एकदा तर्कवितर्क रंगू लागले आहेत.

# देगलूर चेकपोस्टवर चालकांची उघड लूट प्रति वाहन १,००० रुपयांची सक्तीची वसुली


## 'स्टिंग ऑपरेशन'च्या व्हिडिओमुळे खळबळ

दैनिक वादळ वार्ता

**देगलूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवरील देगलूर आरटीओ चेकपोस्टवर मालवाहतूक वाहन चालकांकडून प्रति वाहन तब्बल एक हजार रुपयांची सक्तीची अवैध वसुली केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सोशल मीडियावर या संदर्भातील एक 'स्टिंग ऑपरेशन' व्हिडिओ तुफान व्हायरल झाला असून, यामुळे आरटीओ प्रशासन, वाहतूक विभाग आणि स्थानिक यंत्रणेच्या कारभारावर प्रचंड संतापाची लाट उसळली आहे.


सदरील व्हायरल व्हिडिओमध्ये काही त्रस्त मालवाहतूक चालक चेकपोस्टवरील भयंकर परिस्थिती चव्हाट्यावर आणताना दिसत आहेत. व्हिडिओ बनवणारी व्यक्ती येथे प्रत्येक गाडीमागे १,००० रुपये



सक्तीने उकळले जात आहेत, असा थेट आरोप करत आहे. धक्कादायक बाब म्हणजे, चेकपोस्टवर तैनात असलेले काही खाजगी युवक (दलाल) वाहनांना जबरदस्तीने अडवून, चालकांना अश्लील शिवीगाळ करत आगे **मत जाओ... गाडी रुकाओ...** अशा गुंडशाही भाषेत धमकावत असल्याचे व्हिडिओमध्ये स्पष्ट ऐकू येत आहे.

देगलूर सीमावर्ती मार्गावरून दररोज हजारो आंतरराजकीय मालवाहतूक गाड्यांची ये-जा सुरू असते. सुरक्षेच्या आणि तपासणीच्या नावाखाली सुरू असलेला हा प्रकार म्हणजे अधिकृत तपासणी नसून वाहतूक व्यवस्थेच्या छत्राखाली चाललेली उघड लूट असल्याचा आरोप वाहनधारकांनी केला आहे. चालकांना मानसिक त्रास देणे, धमकावणे आणि पैशांसाठी तासन्तास अडवून ठेवणे हा येथे रोजचाच प्रकार बनल्याचे बोलले जात आहे.हा व्हिडिओ सोशल मीडियावर वाऱ्यासारखा पसरल्यानंतर वाहन चालक संघटना आणि स्थानिक नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. हा केवळ भ्रष्टाचार नसून एक संघटित गुन्हेगारी प्रकार आहे, अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत.संबंधित उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन चौकशी समिती नेमावी, अशी मागणी होत आहे. तसेच, या लुटीमध्ये सामील असलेले आरटीओ अधिकारी, कर्मचारी आणि चेकपोस्टवर अवैधपणे वावरणारे 'टेम्परी दलाल' यांच्यावर थेट फौजदारी गुन्हे दाखल करून हा सीमावर्ती भ्रष्टाचार कायमचा मोडीत काढावा, अशी आग्रही मागणी आता जोर धरत आहे.

## पाऊस पडल्यानंतर माने नगर मूकबधिर शाळेजवळील रस्त्यांची दुरवस्था प्रशासन व लोकप्रतिनिधी लक्ष देणार का?



दैनिक वादळ वार्ता


**उमरगा । प्रतिनिधी**

शहरातील माने नगर परिसरात, विशेषतः मूकबधिर शाळेजवळील रस्त्यांची अवस्था प्रत्येक पावसाळ्यात अत्यंत बिकट होत आहे. थोडासा पाऊस झाला तरी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल, खड्डे व पाण्याचे साचलेले डबके निर्माण होत असून नागरिकांना ये-जा करताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

मागील तब्बल ८ वर्षांपासून या भागातील रहिवाशांची पावसाळ्यातील अवस्था जैसे थे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. शाळकरी विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच वाहनचालकांना दरवर्षी याच समस्येला सामोरे जावे लागत आहे. अनेकवेळा स्थानिक प्रशासन व लोकप्रतिनिधींना याबाबत माहिती देऊनही कायमस्वरूपी तोडगा निघालेला नाही, अशी नाराजी परिसरातील नागरिक व्यक्त करत आहेत.

आता पावसाळा तोंडावर आला असताना नगरपालिका प्रशासन, नूतन आमदार, नगराध्यक्ष तसेच निवडून आलेले नगरसेवक या गंभीर समस्येकडे लक्ष देतील का? नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन तातडीने रस्त्यांची दुरुस्ती व पाणी निचऱ्याची योग्य व्यवस्था करतील का? असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.स्थानिक रहिवाशांनी संबंधित विभागाने त्वरित पाहणी करून रस्त्यांचे मजबुतीकरण व निचरा व्यवस्था सुधारावी, अशी मागणी केली आहे.

## टिप्परच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू




दैनिक वादळ वार्ता

**देगलूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील माळेगाव येथे भरधाव टिप्परच्या धडकेत झालेल्या भीषण अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून एक जण जखमी झाला आहे. या प्रकरणी मरखेल पोलीस ठाण्यात टिप्पर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. १८ मे रोजी रात्री ८ च्या सुमारास माळेगाव बसस्थानक परिसरातील नागनाथ बिरादार यांच्या दुकानासमोर हा अपघात घडला. आरोपी चालकाने टिप्पर क्रमांक एमएच ०५ डीके ५२१७ हे वाहन भरधाव, हयगयीने व निष्काळजीपणे चालवत फिर्यादीच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील अशोक विठ्ठलराव सुकनाळे यांचा मृत्यू झाला तर फिर्यादी गोरख ईरबा टोंपे (वय -७२ रा. मरतोळी ता. देगलूर) हे जखमी झाले आहेत. याप्रकरणी मरखेल पोलीस ठाण्यात गु.र.नं. ८६/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

# मोजाई घाटातील खोल दरीत कोसळून तरुणाचा दुर्दैवी मृत्यू; १५ ते २० दिवसांनंतर मृतदेह आढळला

दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी मोलगी**

डोंगर उतारावरून पाय घसरून आणि तोल जाऊन मोजाई घाटातील खोल दरीत कोसळल्याने एका ३७ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. खेमजी भांगा पाडवी (रा. खाई, गोरजाबारीपाडा, ता. अक्कलकुवा) असे मृत पावलेल्या तरुणाचे नाव आहे. हा अपघात अंदाजे १५ ते २० दिवसांपूर्वी झाला असावा, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. दि. २० रोजी सकाळी या घटनेची माहिती समोर आल्यानंतर मोलगी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.





मिळालेल्या माहितीनुसार, अक्कलकुवा तालुक्यातील खाई (गोरजाबारीपाडा) येथील रहिवासी असलेले खेमजी भांगा पाडवी हे गेल्या १५ ते २० दिवसांपासून बेपत्ता असावेत. दरम्यान, ओहवा गावातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या समोरील मोजाई घाटातील खोल दरीमध्ये दिनांक २० रोजी सकाळी ९ वाजेच्या सुमारास त्यांचा मृतदेह आढळून आला. डोंगर उतारावरून चालत असताना अचानक पाय घसरल्याने आणि तोल गेल्याने ते खोल दरीत कोसळले व गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे.या घटनेबाबत मयताचे काका ऑजऱ्या भामट्या पाडवी (वय ४५, धंदा-शेती) यांनी मोलगी पोलीस ठाण्यात हजर राहून लेखी खबर दिली. या खबरीवरून मोलगी पोलिसांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १९४ अन्वये अकस्मात मृत्यू नुसार गुन्हा दाखल केला आहे. मयताच्या मृत्यूबाबत कुटुंबाची कोणाविरुद्धही तक्रार अथवा संशय नसल्याचे पोलिसांना सांगण्यात आले आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस प्रशासनाकडून तातडीने पावले उचलण्यात आली. उपविभागीय पोलीस अधिकारी सुभाष भोये, मोलगी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक धर्मराज पटले आणि पोलीस उपनिरीक्षक सुजित पाटील यांनी तात्काळ घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली.

सध्या मोजाई घाटातून मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनासाठी मोलगी येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार वनसिंग पाडवी यांच्या मार्गदर्शनाखाली चौकशी अंमलदार पोलीस उपनिरीक्षक सुजित पाटील करत आहेत.

# संपादकीय

## ऊर्जासुरक्षेच्या दिशेने



अणुऊर्जा निर्मितीला गती देण्यासाठी राज्य सरकारने चार कंपन्यांशी केलेले करार, हे महाराष्ट्रच नव्हे, तर साऱ्या देशाच्या ऊर्जा सुरक्षेच्या दिशेने उचललेले पाऊल आहे. सध्याच्या युद्धकाळात भारतासह अनेक देशांच्या ऊर्जा सुरक्षेपुढे उभी राहिलेली आव्हाने पाहता या क्षेत्रातील स्वयंपूर्णतेची गरज लक्षात येते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या या करारांमधून राज्यात २५ हजार ४०० मेगावॉट अणुऊर्जेची निर्मिती होईल. त्यासाठी सुमारे साडेसहा लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार असून, सुमारे सव्वा लाख रोजगारही उपलब्ध होईल, असा दावा आहे. या प्रकल्पांसाठीची अवाढव्य भांडवलाची गरज पाहता, गेल्या वर्षी केंद्र सरकारने 'शांति' कायदा लागू केला.पूर्वी अत्यंत संवेदनशील मानल्या जाणाऱ्या या क्षेत्रात त्याद्वारे खासगी उद्योगांनाही अणुऊर्जा निर्मितीचा मार्ग आता खुला झाला आहे. त्यानुसार रिलायन्स इंडस्ट्रीज, ललितपूर पॉवर जनरेशन कंपनी, अदानी पॉवर लि. आणि नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन (एनटीपीसी) यांनी अणुऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी स्वारस्य दाखवले आहे. अर्थात, सामंजस्य करार ही याची पहिली पायरी असून, प्रकल्पाची प्रत्यक्ष उभारणी आणि तेथून वीजपुरवठा सुरू होण्याचा प्रवास मोठा आहे. त्याला गती देणे, ही जबाबदारी सरकारची.करोना, रशिया–युक्रेन युद्ध आणि आता अमेरिका–इराण युद्धासारख्या तणावांमुळे गेल्या काही वर्षांत पुरवठा साखळी वारंवार विस्कळित होऊन प्रामुख्याने इंधन पुरवठ्याला मोठा फटका बसत आहे. त्यामुळेच अनेक देशांची ऊर्जासुरक्षा धोक्यात येत आहे; सुमारे ८० टक्के इंधन आयातीवर अवलंबून असलेल्या भारतासारख्या देशांना त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागत आहेत. त्यामुळेच बहुसंख्य देशांत ऊर्जा स्वयंपूर्णतेची चर्चा सुरू झाली आहे. भारतातील सद्यस्थिती पाहता, हे लक्ष्य दूरवरचे असले, तरी त्या दिशेने पावले टाकणे आवश्यकच आहे. देशातील सुमारे ७० टक्के वीजनिर्मिती ही आजही कोळशाद्वारेच होते. दुसरीकडे भारताने २०७० पर्यंत कार्बन उत्सर्जन शून्यावर आणण्याचे ध्येय ठेवले असले, तरी त्याबाबतचा ठोस आराखडा अद्याप सादर झालेला नाही. त्यासाठी अन्य पर्यायांकडे वळणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने अणुऊर्जा हा स्वच्छ ऊर्जेचा आणि विसंबण्याजोगा मार्ग असला, तरी अवाढव्य गुंतवणूक, प्रकल्प उभारणीसाठी लागणारा काळ, स्थानिकांचा विरोध, पर्यावरणीय अडचणी आणि सुरक्षेची गरज अशा विविध आव्हानांमुळे देशातील एकूण वीजनिर्मितीत अणुऊर्जेचा वाटा आजही जेमतेम तीन टक्केच आहे.आता केंद्र सरकारने येत्या काही दशकांत एक लाख मेगावॉट इतक्या अणुऊर्जा निर्मितीचे लक्ष्य समोर ठेवले आहे; त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात २५ हजार मेगावॉट अणुऊर्जेची निर्मिती करण्याच्या करारांचे महत्त्व लक्षात येईल. महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्रात आघाडीवर असून येत्या काही वर्षांत राज्यात अनेक औद्योगिक केंद्रे, डेटा सेंटर उभी राहणार आहेत. जीवाश्म इंधनावर आधारलेली व्यवस्था मागे पडत असून अनेक देश पर्यायी वीजस्रोतांचा गांभीर्याने विचार करत आहेत. पेट्रोल–डिझेल वाहनांची जागा आता विजेवरील वाहने घेत आहेत. या सर्वांसाठी भविष्यात अधिकाधिक विजेची गरज असून त्या दृष्टीने अणुऊर्जेकडे पाहिले जाते. चीन, भारत, फ्रान्स आणि अमेरिकेसारखे देश त्यामध्ये रस घेत आहेत.


गेल्या काही काळात सौर ऊर्जानिमितीमध्ये सातत्याने वाढ होत आहे. मात्र, सौर किंवा पवनऊर्जेसारखे पर्याय हे पूरक असून, स्वयंपूर्णतेसाठी जलविद्युत, अणू आणि सौर–पवनऊर्जेसारख्या स्रोतांचे संतुलन गरजेचे आहे. अनेक उद्योगांना २४ तास वीजपुरवठा आवश्यक असतो, त्यासाठी मोठ्या क्षमतेचा विश्वासार्ह पायाभूत स्रोत आवश्यक आहे.अणुऊर्जा हा २४ तास वीज पुरवणारा आणि दीर्घ काळ विसंबून राहण्याजोगा मार्ग आहे. आजवर कोकणात जैतापूरसारख्या प्रकल्पांना स्थानिकांकडून तीव्र विरोध झाला. त्यामुळे प्रकल्प उभारणीस विलंब झाला आणि येथून वीजनिर्मिती कधी सुरू होणार, याची आजही प्रतीक्षा आहे. ताज्या करारांनुसार नियोजित प्रकल्पही रत्नागिरी–सिंधुदुर्गातच येणार आहेत. पूर्वीचा विलंब आणि असंतोष टाळण्यासाठी नागरिकांना विश्वासात घेऊन या प्रकल्पांतून होणाऱ्या विकासाचे वाटेकरी बनवणे महत्त्वाचे आहे; त्याबरोबरच अशा प्रकल्पांमुळे पर्यावरणाला धक्का लागणार नाही, मासेमारीवर विपरीत परिणाम होणार नाहीत, याचीही काळजी घेतली पाहिजे.

# राहुलभैया सोनवणे यांची बीड जिल्हा काँग्रेस अध्यक्षपदी सलग दुसऱ्यांदा फेरनिवड

## खासदार रजनीताई पाटील यांच्या निष्ठावंताला पुन्हा संधी; कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह!

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी राहुल भैया सोनवणे यांची पुन्हा एकदा अत्यंत प्रतिष्ठेची फेरनिवड करण्यात आली आहे. काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस (जनरल सेक्रेटरी) के.सी. वेणुगोपाल यांनी त्यांच्या नियुक्तीचे अधिकृत पत्र जारी केले आहे. राहुलभैया यांच्या या फेरनिवडीमुळे बीड जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, राजकीय आणि सामाजिक स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



**पाटील घराण्याशी एकनिष्ठतेचे फळ!**

राहुलभैया सोनवणे हे राज्यसभेच्या खासदार रजनीताई पाटील यांचे खंदे आणि कट्टर समर्थक म्हणून ओळखले जातात पाटील घराण्याशी असलेल्या त्यांच्या दीर्घकालीन एकनिष्ठतेची पक्षाप्रती असलेल्या प्रामाणिक कार्याची आणि कुशल संघटन कौशल्याची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी पुन्हा एकदा त्यांच्या खांद्यावर जिल्हाध्यक्ष पदाची महत्त्वाची धुरा सोपवली आहे.

**जनआंदोलनांतील सक्रिय सहभाग आणि सर्वसमावेशक नेतृत्व**

गेल्या कार्यकाळात राहुलभैया यांनी बीड जिल्ह्यात काँग्रेस संघटना तळागाळापर्यंत मजबूत करण्यासाठी मोठे प्रयत्न केले.मराठा आरक्षण आंदोलन,देशातील वाढती महागाई,आणि शेतकऱ्यांच्या विविध ज्वलंत प्रश्नांवर त्यांनी नेहमीच रस्त्यावर उतरून आक्रमक संघर्ष केला आहे.ओबीसी समाजातील लहान–मोठ्या सर्व जाती–जमातींमधील लोकांना एकत्र घेऊन चालण्याची त्यांची हातोटी जिल्ह्यात सर्वपरिचित आहे.

**गंगा माऊली शुगर च्या माध्यमातून शेतकऱ्यांचा विकास**

केवळ राजकारणच नव्हे, तर समाजकारण आणि सहकार क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा मोठा ठसा उमटवला आहे.केज तालुक्यातील उमरी येथील गंगामाऊली शुगर'च्या माध्यमातून त्यांनी युसुफगाव सर्कल सह परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वेळोवेळी योग्य भाव देऊन आर्थिक न्याय मिळवून दिला.त्यांच्या या शेतकरीभिमुख धोरणामुळे परिसरात एक प्रकारे 'हरितक्रांती' आकारास आली असून, ते शेतकऱ्यांचे हक्काचे कैवारी बनले आहेत.

राहुलभैया सोनवणे यांच्या या फेरनिवडीमुळे बीडजिल्ह्यातील आगामी राजकीय समीकरणांना नवी दिशा मिळणार असून,त्यांच्या या निवडीचे राजकीय, सामाजिक आणि सहकार क्षेत्रातून जोरदार स्वागत केले जात आहे.

> पक्षश्रेष्ठींनी आणि खासदार रजनीताई पाटील यांनी माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे,त्याला तडा जाऊ न देता जिल्ह्यात काँग्रेसपक्ष अधिक मजबूत करण्यासाठी आणि सर्वसामान्य,गरीब व शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी मी कटिबद्ध राहीन.
> – राहुलभैया सोनवणे
> (नवनियुक्त जिल्हाध्यक्ष, बीड जिल्हा काँग्रेस)

# NEET पेपरफुटीचे धागेदोरे अंबाजोगाईपर्यंत

## लातूरमध्ये तयारी करणारे दोन विद्यार्थी CBI च्या रडारवर, मोबाईल जप्त, गुप्त चौकशीने खळबळ

**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

देशभरात गाजत असलेल्या NEET पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे आता बीड जिल्ह्यासह अंबाजोगाईपर्यंत पोहोचले असून केंद्रीय अन्वेषण विभागानo (CBI) आज अंबाजोगाईत धडक कारवाई करत दोन संशयित विद्यार्थ्यांची कसून चौकशी केली. या कारवाईमुळे शैक्षणिक क्षेत्रासह संपूर्ण मराठवाड्यात मोठी खळबळ उडाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, सीबीआयचे विशेष पथक बुधवारी सकाळी अत्यंत गोपनीय पद्धतीने अंबाजोगाई शहरात दाखल झाले. स्थानिक स्तरावर कोणतीही माहिती न देता पथकाने थेट संशयित विद्यार्थ्यांचा शोध घेत त्यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. जवळपास दोन तास अज्ञात ठिकाणी या विद्यार्थ्यांची मॅरेथॉन चौकशी करण्यात आली.

चौकशीदरम्यान सीबीआयने दोन्ही विद्यार्थ्यांचे मोबाईल फोन, मेमरी कार्ड आणि काही डिजिटल पुरावे जप्त केले आहेत. संबंधित विद्यार्थी लातूर येथे राहून NEET



परीक्षेची तयारी करत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे लातूरमधील कोचिंग नेटवर्क आणि पेपरफुटी रॅकेट यामधील संभाव्य संबंधांची तपास यंत्रणा चौकशी करत असल्याची चर्चा सुरू आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, परीक्षेपूर्वीच गैरमार्गाने किंवा आर्थिक व्यवहारातून प्रश्नपत्रिका मिळाल्याचा संशय सीबीआयला आहे. जप्त करण्यात आलेल्या मोबाईलमधील चॅट्स, कॉल रेकॉर्ड आणि डिजिटल डेटा फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवण्यात आला असून त्यातून मोठे खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, बीड आणि लातूर जिल्हे आधीच NEET प्रकरणामुळे चर्चेत असताना आता अंबाजोगाईत झालेल्या या कारवाईमुळे मराठवाड्यातील शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे. या रॅकेटची पाळेमुळे किती खोलवर गेली आहेत, याचा तपास आता वेगाने सुरू असून पुढील काही दिवसांत आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# राष्ट्रीय महामार्गालगत पुन्हा टपऱ्या बसविण्याच्या हालचालींनी खळबळ

## शहराचे विद्रूपीकरण करण्याचा प्रयत्न का? नागरिकांचा सवाल

**प्रशासनाच्या नाकावर टिचून केज तहसील कार्यालयासमोरील बसथांब्यावर चक्क भेळ, पाणीपुरीचा गाडा**

**राष्ट्रीय महामार्गालगत अतिक्रमण हटाव मोहीम राबवून प्रशासनाने टपऱ्या व गाडे हटवले असतानाच तहसील कार्यालयासमोरील बसथांब्यावर पुन्हा भेळ, पाणीपुरीचा गाडा लागल्याने नागरिकांमधून आश्चर्य व्यक्त केले जात आहे. तहसील कार्यालयासमोरच सुरू झालेल्या या अतिक्रमणावर तहसीलदार कारवाई करणार का ? असा सवाल आता नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.**

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या कामासाठी प्रशासनाने अलीकडेच मोठ्या प्रमाणात अतिक्रमण हटाव मोहीम राबवत रस्त्यालगत उभारण्यात आलेल्या टपऱ्या, शेड आणि इतर अतिक्रमणे हटवली होती. या कारवाईमुळे शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत झाली असून शहराचे सौंदर्यही काही प्रमाणात खुलल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे.

मात्र आता पुन्हा काही स्वयंघोषित सामाजिक कार्यकर्त्यांकडून राष्ट्रीय महामार्गालगत टपऱ्या बसविण्यासाठी हालचाली सुरू झाल्याची चर्चा शहरात रंगू लागली आहे. त्यामुळे नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात असून, शहराचे विद्रूपीकरण पुन्हा करण्याचा प्रयत्न सुरू आहे का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.



राष्ट्रीय महामार्गालगत अनधिकृत टपऱ्या उभारल्यामुळे यापूर्वी वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता. तसेच अपघातांचे प्रमाण वाढल्याच्या तक्रारीही वारंवार समोर येत होत्या. त्यातच रस्त्याच्या कडेला अस्वच्छता, अतिक्रमण आणि अनियोजित बांधकामांमुळे शहराच्या सौंदर्यावर परिणाम होत असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे.

दरम्यान, प्रशासनाने मोठ्या मेहनतीने हटवलेले अतिक्रमण पुन्हा उभे राहत असल्यास संबंधित विभागाने तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. विकासकामे आणि शहराचे सौंदर्य अबाधित ठेवण्यासाठी प्रशासनाने कठोर भूमिका घ्यावी, अशी अपेक्षाही व्यक्त केली जात आहे.

# द आयईटी इंडिया शिष्यवृत्ती पुरस्काराच्या दहाव्या आवृत्तीसाठी अर्ज प्रक्रिया सुरू:पारितोषिक रक्कम दुप्पट वाढवत २० लाख रुपये घोषित

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

जगातील अग्रगण्य व्यावसायिक अभियांत्रिकी संस्थांपैकी एक असलेल्या इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (आयईटी) यांनी देशातील पदवीपूर्व अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठीच्या महत्त्वपूर्ण व्यासपीठांपैकी एक असलेल्या 'आयईटी इंडिया शिष्यवृत्ती पुरस्कार'च्या दहाव्या आवृत्तीची घोषणा केली आहे. या विशेष आवृत्तीच्या निमित्ताने शिष्यवृत्तीची एकूण पारितोषिक रक्कम १० लाख रुपयांवरून दुप्पट वाढवत २० लाख रुपये करण्यात आली आहे. या शिष्यवृत्तीसाठी अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून अर्ज करण्याची अंतिम तारीख १५ जून २०२६ आहे.

गेल्या दशकभरात 'आयईटी इंडिया शिष्यवृत्ती पुरस्कार'ने केवळ शैक्षणिक गुणवत्तेतच नव्हे, तर अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रत्यक्ष जीवनातील समस्यांवर उपाय शोधणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव केला आहे. आरोग्यसेवा सुलभता, शाश्वत शेती, कचरा व्यवस्थापन ते सहाय्यक तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रांमध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी समाजोपयोगी नवकल्पना सादर केल्या आहेत. या पुरस्काराचे माजी विजेते आणि अंतिम फेरीतील विद्यार्थ्यांनी पुढे पल, गूगल, नासा, एमआयटी तसेच आघाडीच्या तंत्रज्ञान कंपन्या आणि संस्थांमध्ये संधी मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. यावरून या उपक्रमातून घडवले जाणारे प्रतिभावान विद्यार्थी अधोरेखित होत आहेत.

दहाव्या आवृत्तीबाबत बोलताना आयईटी इंडिया शिष्यवृत्ती पुरस्कार सल्लागार समितीचे अध्यक्ष प्रा. अभिजित चक्रवर्ती म्हणाले, आयईटी इंडिया शिष्यवृत्ती पुरस्काराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष जीवनातील आव्हानांकडे गांभीर्याने पाहावे आणि अभियांत्रिकी तत्त्वांचा नाविन्यपूर्ण तसेच




उपयुक्त पद्धतीने वापर करावा, यासाठी आम्ही प्रोत्साहन देत आहोत. गेल्या काही वर्षांत देशभरातून अनेक गुणवान विद्यार्थी पुढे आले असून, ही दहावी आवृत्ती त्या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा आहे.ही शिष्यवृत्ती देशभरातील एआयसीटीई किंवा यूजीसी मान्यताप्राप्त संस्थांमध्ये कोणत्याही शाखेत आणि कोणत्याही वर्षात पूर्णवेळ पदवीपूर्व अभियांत्रिकी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी खुली आहे. अर्जदारांना किमान ६० टक्के गुण किंवा ६.० सीजीपीए आवश्यक असून सर्व शैक्षणिक श्रेयांक पूर्ण केलेले असणे बंधनकारक आहे. या शिष्यवृत्तीसाठी वयोमर्यादा किंवा अर्ज शुल्क ठेवण्यात आलेले नाही. या शिष्यवृत्तीची निवड प्रक्रिया चार टप्प्यांत पार पडणार असून त्यामध्ये ऑनलाइन अर्ज, राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाइन परीक्षा, विभागनिहाय उपाययोजना सादरीकरण फेरी तसेच बंगळुरू येथे होणारी राष्ट्रीय अंतिम फेरी यांचा समावेश आहे. अंतिम फेरीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञांसमोर अभियांत्रिकीआधारित उपाययोजना सादर करण्याची संधी मिळणार आहे.

# सैनिक स्कूलचा डंका! इयत्ता ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेत उदगीरच्या छत्रपती शाहू महाराज सैनिकी विद्यालयाचे उत्तुंग यश

## ३ विद्यार्थ्यांना २०० पेक्षा अधिक गुण; तब्बल ३१ विद्यार्थी पात्र, यशाची परंपरा कायम

दैनिक वादळ वार्ता

**लातूर । प्रतिनिधी**

लातूर जिल्ह्यातील उदगीर येथील श्री छत्रपती शाहू महाराज सैनिकी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या यशाची दैदिप्यमान परंपरा कायम राखत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील इयत्ता ८ वीच्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात विद्यालयाचे तब्बल ३१ विद्यार्थी पात्र ठरले असून, ३ विद्यार्थ्यांनी २०० पेक्षा अधिक गुणांचा टप्पा पार केला आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने २२ फेब्रुवारी २०२६ रोजी ही परीक्षा घेण्यात आली होती, ज्याचा निकाल १८ मे २०२६ रोजी घोषित करण्यात आला.

**आर्यन जाधव विद्यालयात प्रथम!**

या परीक्षेत सैनिकी विद्यालयातून एकूण ४९ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ३१ विद्यार्थ्यांनी पात्रतेचा निकष पार केला. यामध्ये दर्जेदार गुणांची कमाई करत आर्यन जाधव याने २०६ गुणांसह विद्यालयात प्रथम येण्याचा बहुमान मिळवला. तर शैलेश हंगरगे याने २०४ गुण मिळवून द्वितीय आणि रामचंद्र कोंपले याने २०० गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला.

**शिक्षकांचे उत्कृष्ट नियोजन आणि मार्गदर्शन**

विद्यार्थ्यांच्या या यशामागे विद्यालयातील शिक्षकांचे अथक परिश्रम आणि चोख नियोजन होते. शिष्यवृत्ती परीक्षा विभाग प्रमुख सौ. उज्वला वडले यांनी उत्कृष्ट नियोजन करून निकालाची ही परंपरा कायम ठेवली.

विद्यार्थ्यांकडून विषयानुरूप तयारी करून घेण्यामध्ये खालील शिक्षकांचे योगदान लाभले:







सौ.उज्वला वडले (गणित)
डॉ.बालाजी मुस्कावाड (मराठी)
विनायक करेवाड (आय.टी.)
संतोष चामले (इंग्रजी)

तसेच पर्यवेक्षक अरविंद सोनटक्के, विजय कावळे, संतोष चामले (गणित), नागेश पंगू आणि बालाजी कांबळे यांनीही विद्यार्थ्यांना वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन केले.विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या उत्तुंग यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार गट) महाराष्ट्र राज्य सरचिटणीस बसवराज म. पाटील नागराळकर, उपाध्यक्ष तथा नगरसेवक चंदन पाटील नागराळकर, शालेय समितीचे अध्यक्ष दिलीप पाटील नागराळकर आणि सहसचिव चेतन पाटील नागराळकर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे विशेष कौतुक केले.तसेच विद्यालयाचे प्राचार्य वसंत कुलकर्णी, पर्यवेक्षक अरविंद सोनटक्के, विभाग प्रमुख संतोष चामले व विलास शिंदे, प्रा. प्रदीप कोठारे यांच्यासह सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# उन्हाळी सुट्यांमध्येही शिक्षकांची वृक्षांसाठी धडपड!

## गोंधनखेड शाळेतील श्रीधर जायभाये यांचा पर्यावरण जपण्याचा प्रेरणादायी उपक्रम

दैनिक वादळ वार्ता

**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**

झाडे जगली तरच भविष्यातील पिढी सुरक्षित राहील, हा संदेश कृतीतून देत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा गोंधनखेड येथील विषय शिक्षक श्रीधर रामभाऊ जायभाये यांनी सुट्टीच्या दिवशीही शाळेत येऊन वृक्षांना पाणी देण्याचा स्तुत्य उपक्रम राबविला. त्यांच्या या संवेदनशील कृतीचे परिसरात कौतुक होत असून विद्यार्थ्यांसमोर आदर्श निर्माण झाला आहे. उन्हाळ्याच्या तीव्र झळांमुळे शाळा परिसरातील अनेक झाडे कोमेजून जात असल्याचे चित्र पाहून श्रीधर जायभाये यांना राहवले नाही. कामानिमित्त शाळेत आले असता त्यांनी स्वतःचे काम बाजूला ठेवून तातडीने झाडांना पाणी देण्यास



सुरुवात केली. मात्र, बोअरवेलचे पाणी मध्येच संपल्याने काही वृक्षांना पाणी देता आले नाही.

यामुळे दुसऱ्याच दिवशी त्यांनी पुन्हा शाळेत येऊन उर्वरित झाडांनाही पाणी दिले. विशेष म्हणजे, मागील दिवशी पाणी मिळालेली झाडे दुसऱ्या दिवशी टवटवीत आणि प्रफुल्लित झालेली पाहून त्यांना मोठे समाधान मिळाले.

आजच्या धावपळीच्या काळात अनेकजण पर्यावरण संवर्धनाबाबत केवळ चर्चा करताना दिसतात; मात्र श्रीधर जायभाये यांनी प्रत्यक्ष कृतीतून वृक्षप्रेम जपले. त्यांच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्येही वृक्षसंवर्धनाची जाणीव निर्माण होत असून एक शिक्षक समाजाला दिशा देऊ शकतो, याची प्रचिती पुन्हा एकदा आली आहे.गोंधनखेड शाळा परिसर हिरवागार ठेवण्यासाठी शिक्षकांनी घेतलेली ही मेहनत पर्यावरण संवर्धनासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# पत्रकारावर हल्ल्याप्रकरणी पत्रकार संघटनांचे निवेदन!

## दोषींवर कारवाईची मागणी; आंदोलनाचा इशारा

दैनिक वादळ वार्ता

**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**

राहेरी येथील वाळू घाटावर वार्तांकनासाठी गेलेल्या पत्रकार रामदास कहाळे यांच्यावर वाळू वाहतूकदार कंत्राटदार व त्यांच्या साथीदारांनी दि १९ मे रोजी मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी पत्रकार संघटनांनी बुधवारी दि २० मे रोजी उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांना निवेदन देत मारहाण करणाऱ्या दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली.



पत्रकार कहाळे हे वाळू घाटावरील घडामोडींचे लाईव्ह वार्तांकन करत असताना त्यांच्यावर हल्ला करण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तसेच पीडित पत्रकारावरच किनगाव राजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याने पत्रकारांमध्ये संताप व्यक्त होत आहे. मारहान करणाऱ्या दोषींना तात्काळ अटक करावी व पत्रकारावरील खोटा गुन्हा मागे घ्यावा, अशी मागणी सिंदखेड राजा पत्रकार संघटनांनी केली असून सदर निवेदनावर मुकुंद पाठक ,नंदू वाघमारे, गजानन मेहेत्रे, राहुल झोटे, देवानंद झोटे भगवान साळवे, विजय भालमोडे, बुद्धू चौधरी, शेख जाकेर, सुरेश हुसे, ज्ञानेश्वर बुधवत, छगन झोरे, रफिक शेख, अनिल दराडे, रवी ढवळे याच्यासह तालुक्यातील १६ अधिक पत्रकारांच्या सहया आहेत कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# भाजप-शिवसेनेच्या गोंधळावर काँग्रेस आक्रमक ठाणे पालिका मुख्यालयासमोर जोरदार निदर्शने!

## 'हिंदी-चिनी भाई भाई, भाजप-शिवसेना मिलके खाई'च्या घोषणांनी परिसर दणाणला; जनसामान्यांचे प्रश्न ऐरणीवर

दैनिक वादळ वार्ता

**ठाणे । प्रतिनिधी**

ठाणे महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत सत्ताधारी शिवसेना आणि भाजपमध्ये सातत्याने होत असलेल्या अभद्र गोंधळाच्या निषेधार्थ आज इंडियन नॅशनल काँग्रेस पक्षाने आक्रमक पवित्रा घेतला. काँग्रेसचे शहराध्यक्ष विक्रांत चव्हाण यांच्या धडाकेबाज नेतृत्वाखाली आज ठाणे पालिका मुख्यालयासमोर सत्ताधाऱ्यांविरोधात प्रचंड निदर्शने करण्यात आली. यावेळी कार्यकर्त्यांनी महापालिका प्रशासनाचा आणि सत्ताधाऱ्यांचा तीव्र शब्दांत निषेध केला.



मागील आठवड्यात झालेल्या महासभेत शिवसेना आणि भाजप यांच्यातील अंतर्गत वादामुळे अवघ्या काही वेळातच सभा गुंडाळण्यात आली होती. यावर बोलताना काँग्रेस शहराध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी सत्ताधाऱ्यांवर कडाडून टीका केली. ते म्हणाले,

तब्बल तीन वर्षांनंतर पालिकेचे सभागृह अस्तित्वात आले आहे. नागरिकांना वाटले होते की आता तरी त्यांच्या हक्काच्या प्रश्नांवर चर्चा होईल. मात्र, जनतेच्या मूलभूत समस्यांवर चर्चा करण्याऐवजी सत्ताधारी केवळ स्वतःच्या अंतर्गत वादात सभागृहाचा वेळ वाया घालवत आहेत. घाईघाईने आणि गोंधळात कोट्यवधींचे विषय मंजूर करून घेतले जात असून लोकशाहीचा गळा घोटला जात आहे.विक्रांत चव्हाण यांनी पालिकेच्या एकूणच कारभारावर बोट ठेवत सांगितले की, सत्ताधाऱ्यांच्या या अरेरावीमुळे नवीन नगरसेवकांना आपापल्या प्रभागातील समस्या मांडण्याची कोणतीही संधी मिळत नाहीये. पालिका सभागृह सुरू होऊनही अद्याप स्थायी समिती, विशेष समित्या आणि प्रभाग समित्या स्थापन करण्यात आलेल्या नाहीत. यामुळे पालिकेचा संपूर्ण कारभार अत्यंत भोंगळ आणि दिशाहीन झाला असून ठाणे शहरातील विकासकामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत.

आंदोलनादरम्यान काँग्रेस कार्यकर्त्यांचा संताप अनावर झाला होता. आंदोलनकर्त्यांनी हिंदी-चिनी भाई भाई, भाजपा-शिवसेना मिलके खाई! अशा जोरदार आणि उपरोधिक घोषणा देत संपूर्ण पालिका मुख्यालय परिसर दणाणून सोडला. या घोषणाबाजीने पालिका वर्तुळात चांगलीच खळबळ उडाली होती.

आयुक्तांना निवेदन: 'त्या' संशयास्पद विषयांची फेरचौकशी करा!

आंदोलनानंतर विक्रांत चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील एका प्रमुख शिष्टमंडळाने महापालिका आयुक्त आणि अतिरिक्त आयुक्त रोडे यांची भेट घेतली व त्यांना मागण्यांचे निवेदन सादर केले.

**काँग्रेसच्या प्रमुख मागण्या**

घाईघाईने मंजूर करण्यात आलेल्या विषयांमध्ये अनेक कायदेशीर आणि आर्थिक त्रुटी आहेत, त्याचा सखोल अभ्यास व्हावा.

संशयास्पद विषय पुन्हा महासभेसमोर मंजुरीसाठी ठेवावेत किंवा अंतिम मंजुरीसाठी शासनाकडे पुनर्विचारासाठी पाठवावेत.रखडलेल्या प्रभाग आणि विषय समित्या तात्काळ स्थापन कराव्यात.

या आंदोलनात आणि शिष्टमंडळात काँग्रेसचे ज्येष्ठ नेते भालचंद्र महाडिक, निशिकांत कोळी, शैलेश घरत, उमेश कांबळे, वैशाली भोसले, स्वप्नील कोळी यांच्यासह विविध ब्लॉक अध्यक्ष, महिला आघाडी आणि शेकडो कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ठाणे महापालिकेतील सत्ताधारी शिवसेना आणि भाजपमधील अंतर्गत राजकीय संघर्ष आता विकोपाला गेला आहे. मात्र, या दोघांच्या 'तू-तू मैं-मैं' च्या राजकारणात ठाणे शहराचा विकास मात्र पूर्णपणे रसातळाला गेला असून, सत्ताधाऱ्यांच्या या नाकर्तेपणामुळे सामान्य ठाणेकर नागरिकांमधून आता तीव्र संताप व्यक्त होत आहे.

# खतांची अनियमितता आढळल्यास कृषी केंद्रांचा परवाना रद्द करणार: परवाना प्राधिकारी संतोष डाबरे यांचा इशारा

दैनिक वादळ वार्ता

**बुलढाणा । प्रतिनिधी**

मेहकर येथील 'अजंठा ग्रो सर्व्हिसेस सेंटर'वर खतांचा काळाबाजार आणि शेतकऱ्यांची फसवणूक केल्याप्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल झाल्यानंतर कृषी विभाग आता पूर्णपणे क्शन मोडमध्ये आला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परवाना प्राधिकारी संतोष डाबरे यांनी जिल्ह्यातील सर्व कृषी केंद्र चालकांना कडक शब्दांत इशारा दिला आहे.संतोष डाबरे यांनी स्पष्ट केले की, शेतकऱ्यांच्या हक्काच्या आणि शासनाच्या अनुदानित खतांमध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता किंवा काळाबाजार खपवून घेतला जाणार नाही. ई-पॉस (E-POS) मशीनवरील खतांचा साठा आणि गोदामातील प्रत्यक्ष साठा यामध्ये तफावत आढळल्यास, किंवा शेतकऱ्यांच्या आधार कार्डचा गैरवापर करून बनावट नोंदी केल्याचे समोर आल्यास संबंधित कृषी केंद्रावर तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल.ई-पॉस मशीनवर दिसणारा खताचा साठा आणि प्रत्यक्ष गोदामातील साठा यात कोणतीही तफावत राहता कामा नये. कोणत्याही कृषी केंद्रात परवाना संपलेली (Expiry झालेल्या) खते किंवा कीटकनाशके आढळून आल्यास ते जप्त करून कडक कारवाई केली जाईल. परवाना नसलेली किंवा लेबल व घटकांमध्ये फरक असलेली संशयास्पद उत्पादने दुकानात ठेवल्यास थेट विक्री बंदी आणली जाईल. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आणि साठा रजिस्टर अपूर्ण ठेवणाऱ्या केंद्रांचा परवाना कायमचा रद्द (Cancel) करण्यात येईल, असा कडक इशारा देण्यात आला आहे. अजंठा ग्रो सर्व्हिसेस'वर झालेली कारवाई ही केवळ सुरुवात असून, यापुढे संपूर्ण जिल्ह्यात कृषी विभागाच्या भरारी पथकांद्वारे अशीच धडक तपासणी मोहीम राबवली जाईल, असेही संतोष डाबरे यांनी सांगितले. त्यामुळे आगामी खरिपाच्या पार्श्वभूमीवर सर्व कृषी केंद्र चालकांनी आपले रेकॉर्ड आणि खत विक्री पारदर्शक ठेवावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

# दरोड्याच्या तयारीत असलेल्या सहा संशयित आरोपींना अटक

## शिंदाळा शिवारात भादा पोलिसांकडून कारवाई

दैनिक वादळ वार्ता

**औसा । प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील भादा पोलीस ठाण्याच्या हद्दीत दरोड्याच्या तयारीत असलेल्या सहा संशयित आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतल्याची घटना (दि १९ मे) मंगळवार रोजी पहाटे उघडकीस आली. याप्रकरणी औसा तालुक्यातील भादा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिंदाळा शिवारातील राधिका कला केंद्राच्या दक्षिण बाजूस आण्णाराव मुळे यांच्या शेतात काही जण दरोडा टाकण्याच्या तयारीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी पहाटे छापा टाकून आरोपींना ताब्यात घेतले. या प्रकरणी दत्ता भगवान माने (रा. कुनसावळी, ता. तुळजापूर), कार्तिक प्रकाश वाघमोडे, भीमाशंकर दामशेट्टी, साईसतीश पंडित जाधव, अक्षय शिवराज दुधभाते (रा. येणेगुर, ता. उमरगा) आणि महेश शिवराज सोलंकर (रा. आचलेर, ता. लोहारा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी कपील मारोतीराव पाटील यांच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात **पोलीस ठाणे भादा** आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पुरी हे करीत आहेत.या कारवाईत सपोनि जाधव, पोलिस उपनिरीक्षक पुरी तसेच यासाठी पोलीस हवालदार (२८५), शिंदे (१२९२), पोलीस हवालदार कांबळे, पोलीस कॉन्स्टेबल चव्हाण, राऊत, संदीप, राठोड सहाय्यकफौजदार खेडकर, पोलीस हवालदार चंद्रकांत कलमे यांनी या कामगिरीमध्ये चांगल्या प्रकारे कामगिरी करून दरोडेच्या तयारीत असलेले आरोपीना सीताफिने पकडून एका मोठा अनर्थ, मोठा गुन्हा घडण्यापासून टळले आहे. याप्रसंगी भादा पोलीस ठाण्याच्या पथकाने सहभाग घेतला होता.

# सातपुड्याच्या कुशीत दिवसाढवळ्या वनसंपदेची कत्तल
# मेवासी वनविभागाचे अधिकारी 'बघ्याच्या' भूमिकेत?

## बारीखाडी परिसरात सागवान वृक्षांची राजरोस तोड; आमलीबारी डोंगरावरील आगीत जैवविविधता खाक; सामाजिक कार्यकर्त्यांची उपवनसंरक्षकांकडे पुराव्यासह तक्रार

दैनिक वादळ वार्ता
**रवींद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी**

सातपुडा परिसरातील मोलगी, भगदरी, काठी, डाब आणि वडफळी वन विभागाच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड सुरू असून, शासकीय अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे येथील वनसंपदा नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचा खळबळजनक आरोप करण्यात आला आहे. काठी (ता. अक्कलकुवा) येथील सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र सरवरसिंग पाडवी यांनी या संदर्भात तळोदा येथील मेवासी वनविभागाच्या उपवनसंरक्षकांना लेखी तक्रार अर्ज सादर केला असून, दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

मेवासी वनविभागांतर्गत येणाऱ्या मोलगी - भगदरी,काठी, डाब,वडफळी गावाच्या सीमेवरील 'बारीखाडी' या ठिकाणी पूर्वी मोठ्या प्रमाणावर मौल्यवान सागवान आणि इतर प्रजातींची जिवंत झाडे होती. या वनसंपदेचे रक्षण करण्याची जबाबदारी शासनाने संबंधित बीट अंतर्गत येणाऱ्या वनक्षेत्रपाल , वनपाल आणि वनरक्षक यांच्यावर सोपवली आहे. मात्र, सध्या या भागात दिवसाढवळ्या मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर वृक्षतोड सुरू आहे. ही वृक्षतोड संबंधित कर्मचाऱ्यांसमोर किंवा त्यांच्या मूक संमतीने होत असून, वनविभागाचे कर्मचारी केवळ 'बघ्याची भूमिका' घेत असल्याचा थेट आरोप तक्रारदाराने केला आहे.

वृक्षतोडीबरोबरच सातपुडा पर्वतातील जंगलांना लागणाऱ्या आगींचे सत्रही सुरूच आहे. आमलीबारी गावाच्या समोरील डोंगरावरील जंगलाला आग लावून तेथील दुर्मिळ जैवविविधता संपूर्णपणे नष्ट करण्यात आली आहे. सातपुड्यातील इतर दुर्गम भागातही अशाच प्रकारे जंगलांना आगी लावण्याच्या घटना घडत असून, यामुळे पर्यावरणप्रेमींमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

बारीखाडी येथील जंगल नष्ट होण्यास कारणीभूत ठरलेले वनक्षेत्रपाल, वनपाल व इतर कर्मचाऱ्यांची 'वनसंपदा नष्ट केल्याप्रकरणी' संपूर्ण चौकशी व्हावी. तसेच या चौकशीचा अहवाल तक्रारदारास मिळावा आणि दोषींवर तात्काळ निलंबनाची किंवा कडक कायदेशीर कारवाई व्हावी, अशी मागणी जितेंद्र पाडवी यांनी केली आहे.

आता या गंभीर तक्रारीनंतर मेवासी वनविभाग यावर काय पावले उचलतो, याकडे नंदुरबार जिल्ह्यातील पर्यावरण वर्तुळाचे लक्ष लागले आहे.



## प्रा.मनोहर धोंडे यांची रेल्वे बोर्ड अध्यक्षांसोबत चर्चा; रेल्वे मार्ग दुरुस्तीसाठी निवेदन सादर

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

शिवा संघटनेच्या वतीने संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांनी मंगळवार दि. १९ मे २०२६ रोजी रेल भवन, नवी दिल्ली येथे भारतीय रेल्वे बोर्डाचे चेअरमन मा. सतीश कुमार यांची प्रत्यक्ष भेट घेऊन विविध रेल्वे विषयांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी मराठवाड्यातील प्रवाशांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या नांदेड – लोहा – खेडकरवाडी – माळाकोळी – माळेगाव – अहमदपूर – चाकूर – लातूर रोड या रेल्वे मार्गाच्या दुरुस्तीबाबत निवेदन सादर केले.

प्रा. मनोहर धोंडे यांनी सांगितले की, या मार्गाची दुरवस्था झाल्यामुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच या रेल्वे मार्गाच्या दुरुस्तीमुळे मराठवाड्यातील ग्रामीण भागाला रेल्वे संपर्क अधिक सक्षम होईल आणि प्रवाशांसह व्यापारी वर्गालाही मोठा फायदा होणार आहे.



यावेळी रेल्वे बोर्डाचे चेअरमन सतीश कुमार यांनी निवेदनाची दखल घेत संबंधित विभागामार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याची माहिती प्रा. धोंडे यांनी दिली. शिवा संघटनेच्या या पाठपुराव्यामुळे मराठवाड्यातील रेल्वे प्रश्नांकडे केंद्र शासनाचे लक्ष वेधले गेले असून, नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

## बेटमोगरा येथे २४ मे रोजी काशी जगद्गुरू १००८ डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजींच्या उपस्थितीत भव्य 'धर्मसभा व दर्शन सोहळा'

दैनिक वादळ वार्ता
**बेटमोगरा । हनुमंत चंदनकर**

श्री शिवलिंग बादशहा मठ संस्थान बेटमोगरा येथे ज्येष्ठ अधिकमासाच्या पावन पर्वावर, जंगम बटू संस्कार शिबीर दि.१० मे ते ५ जुन पर्यंत चालू असलेल्या शिबिरात वीरशैव लिंगायत परंपरेचे सर्वोच्च धर्मगुरू आणि वाराणसीच्या ऐतिहासिक श्रीकाशी ज्ञानपीठाचे ८६ वे जगद्गुरू श्री १००८ डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्य उपस्थितीत रविवार, दिनांक २४ मे २०२६ रोजी बेटमोगरा येथे भव्य 'धर्म सभा व दर्शन सोहळ्याचे' आयोजन करण्यात आले आहे.हा सोहळा तालुक्यातील ऐतिहासिक श्री शिवलिंग बादशहा बृहन्मठ संस्थान, बेटमोगरा येथे संपन्न होणार असून, परिसरातील भाविकांमध्ये यामुळे अत्यंत उत्साहाचे वातावरण आहे.

भाविकांच्या स्वागतासाठी आणि धार्मिक वातावरण निर्मितीसाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे: दुपारी ४:०० वाजता: जगद्गुरू महास्वामीजींचे भव्य स्वागत, मिरवणूक आणि 'ग्रंथ दिंडी'. सायंकाळी ६:०० वाजता: मुख्य 'धर्मसभा आणि दर्शन सोहळा' या सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आव्हानं सदगुरु १०८ ष. ब्र. डॉ.सिद्धदयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर यांनी केलं आहे. जगद्गुरू महास्वामीजींचे महाराष्ट्राशी घट्ट नाते वाराणसी येथील प्रसिद्ध जंगमवाडी मठाचे मठाधिपती आणि 'श्री काशी ज्ञानपीठा'चे पीठाधीश्वर असलेल्या महास्वामीजींनी जगभर अध्यात्म, धर्म आणि संस्कृतीचा प्रसार केलाआहे. लिंगायत समाजाने एकत्र येऊन प्रगती करावी आणि आध्यात्मिक मूल्यांचा समाजात विकास व्हावा, यासाठी ते निरंतर कार्यरत असतात. त्यांचे 'जन्म हा आखेरचा' हे मराठी पुस्तकही भाविकांमध्ये अत्यंत लोकप्रिय आहे. पंढरपूरसारख्या पवित्र ठिकाणी त्यांचे तपोनुष्ठान झाले असून, महाराष्ट्रातील भाविकांशी त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे नाते आहे. त्यामुळे सर्व परिसरातील भाविकांनी या सोहळ्यात सहभागी होऊन आपले जीवन सार्थकी करावे.



## नागपुरात शिवानी वडेट्टीवार यांच्या शाही स्वागत समारंभात मान्यवरांची उपस्थिती

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । प्रतिनिधी**

विधानसभेचे माजी विरोधी पक्षनेते तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांच्या कन्या चि. सौ. कां. शिवानी यांच्या शाही व नयनरम्य स्वागत समारंभाचे आयोजन बुधवारी नागपूर येथे मोठ्या उत्साहात पार पडले. या सोहळ्यास विविध क्षेत्रातील राजकीय, सामाजिक व क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून नवदांपत्यास शुभाशीर्वाद दिले.

या प्रसंगी शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांनी समारंभाला विशेष उपस्थिती दर्शवत शिवानी यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमादरम्यान अनेक मान्यवरांशी त्यांच्या सदिच्छा भेटीगाठी झाल्या तसेच विविध सामाजिक व राजकीय विषयांवर चर्चा रंगली.



समारंभात माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण ,आमदार सुजया ताई चव्हाण, प्रसिद्ध क्रिकेटपटू तथा भारतीय संघाचे माजी कर्णधार मोहमद्द अझरोदीन, राज्यसभेचे खासदार रामराव वडकुते, जलसंधारण मंत्री संजय राठोड, काँग्रेसचे प्रदेश नेते तथा विधानसभेचे माजी अध्यक्ष नाना पटोले, माजी आमदार अमरभाऊ राजूरकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.शाही सजावट, आकर्षक रोषणाई आणि पारंपरिक आदरातिथ्यामुळे स्वागत समारंभाला विशेष शोभा प्राप्त झाली. उपस्थित पाहुण्यांनी नवदांपत्यास शुभेच्छा देत भोजनाचा आस्वाद घेतला. नागपूरच्या सामाजिक व राजकीय वर्तुळात या समारंभाची विशेष चर्चा रंगली.

## काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष नियुक्त्यांमध्ये व्यापक सोशल इंजिनिअरिंग

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने राज्यभर राबविण्यात येत असलेल्या संघटन सृजन अभियान अंतर्गत जिल्हाध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर करताना व्यापक सोशल इंजिनिअरिंगचा अवलंब केला आहे. सामाजिक समतोल, विविध समाजघटकांना प्रतिनिधित्व, स्थानिक नेतृत्वाची स्वीकारार्हता आणि संघटनात्मक क्षमता या निकषांवर आधारित नियुक्त्या करण्यात आल्याचे पक्षाकडून सांगण्यात आले.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने जिल्हाध्यक्ष नियुक्ती प्रक्रिया व्यापक पद्धतीने राबवली होती. पक्षाने नियुक्त केलेल्या निरीक्षकांनी विविध जिल्ह्यांमध्ये दौरे करत पदाधिकारी, कार्यकर्ते, स्थानिक नेते आणि समाजघटकांशी संवाद साधून संघटनात्मक परिस्थितीचा आढावा घेतला. त्यानंतर जिल्हानिहाय नावांच्या शिफारसी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्याकडे पाठवण्यात आल्या होत्या.

राज्यात एकूण ६९ जिल्हाध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली असून त्यामध्ये ओपन प्रवर्ग, ओबीसी, अल्पसंख्याक, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, तगछढ आणि महिलांना प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. विशेषतः ओबीसी समाजातील विविध घटकांना मोठ्या प्रमाणावर संधी देण्यात आल्याची चर्चा आहे. तसेच अनुसूचित जाती आणि अल्पसंख्याक समाजालाही महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे.

दरम्यान, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर संघटनात्मक पुनर्बांधणीला वेग देण्यात आला असून तालुका, विभाग, आघाडी आणि सेल स्तरावरही नियुक्ती प्रक्रिया सुरू आहे. राज्यभरात सुमारे सात हजार नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात येत असल्याची माहिती पक्षाकडून देण्यात आली.काँग्रेस पक्षाच्या या निर्णयामुळे आगामी राजकीय आणि संघटनात्मक लढाईसाठी पक्ष सर्व समाजघटकांना सोबत घेऊन पुढे जात असल्याचा स्पष्ट संदेश दिला जात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

## गप्पेवाडीत मृत्यूचा सापळा कायम? तात्पुरत्या दुरुस्तीवर ग्रामस्थांचा संताप
## फक्त कागदावरचे अहवाल नकोत, कार्यवाही हवी ग्रामस्थांची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील गप्पेवाडी परिसरातील धोकादायक वीजतारा आणि कललेल्या वीज खांबांचा प्रश्न दिवसें दिवस गंभीर बनत असून पावसाळा तोंडावर असतानाही कायम स्वरूपी उपाययोजना करण्यात आलेल्या नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.महावितरण उपकेंद्र विडा कार्यालयाकडून काही ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपाची तार दुरुस्ती करण्यात आली असली तरी ती केवळ दिखाऊ आणि अपुरी असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.बाराभाई वस्ती ते महादेव वस्ती परिसरा तील लाईनला जुन्या वीज तारा असून काही वीजखांब धोकादायक अवस्थेत कललेले आहेत.जोरदार वारे, मुसळधार पाऊस आणि विजांच्या कडकडाटामुळे हे तारे कधीही तुटून मोठी दुर्घटना घडू शकते, अशी भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. विशेषतः लहान मुले, शेतकरी आणि नागरिकांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो.ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार,महा वितरण कर्मचाऱ्यांनी काही ठिकाणी तारा बांधणे व किरकोळ दुरुस्ती करून काम पूर्ण झाल्याचे दाखवले आहे. मात्र प्रत्यक्षात संपूर्ण लाईन जीर्ण अवस्थेत असून जुन्या वीज तारा बदलणे,धोकादायक खांब हटवणे आणि नवीन खांब उभारणे अत्यावश्यक आहे.

महावितरण कर्मचारी यांनी काही दुरुस्तींचे अहवाल तयार केले असले तरी ते फक्त कागदावरच राहू नयेत. याआधीही अनेक वेळा तात्पुरते अहवाल तयार झाले,मात्र प्रत्यक्षात कोणतीही कायमस्वरूपी कारवाई झाली नाही, असा आरोप ग्रामस्थांनी केला.दरम्यान,पावसाळा सुरु होण्यापूर्वी संपूर्ण परिसराची तात्काळ वरीष्ठ अधिकारी यांनी तातडीने पाहणी करून कायमस्वरूपी दुरुस्ती करण्यात यावी,अन्यथा भविष्यात मोठी जीवितहानी झाल्यास त्याला जबाबदार कोण? असा सवाल नागरिकां कडून उपस्थित केला जात आहे.प्रशासनाने या गंभीर प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन ठोस निर्णय घेऊन योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077